भाग्यशाली मोजे

बर्नार्ड वाइसमैन


मराठी: अश्विनी बर्वे



भाग्यशाली मोजे




बर्नार्ड वाइसमैन



भाग्यशाली मोजे

बर्नार्ड वाइसमैन





भाग्यशाली मोजे

शर्यत जवळपास संपत आली होती.

पैडी बार्न्स, तिसऱ्या स्थानावर होता.

त्याचा मित्र जेव्हा चब स्मिथ ओरडला.

“धाव दोस्ता! अजून वेगात धाव!”



पैडी वेगाने धावला. तो धावला. त्याने तेजी बोबो कैंपबेलला मागे टाकले आणि मग दुसऱ्या स्थानावर आला.

होवी हेन्स पहिल्या स्थानावर धावत होता.

होवीने अंतिम रेषेकडे धावू लागला.

पैडीपण खूप वेगाने धावला.

त्याने होवीला सुद्धा पार केले आणि शर्यत जिंकली.



चब वर गेला

त्याने पैडीची पाठ प्रेमाने थोपटली.

“खूप छान!” चब ओरडला.

“तू परत जिंकला!


तू एक महान धावपटू आहेस.”

वेगाने धावल्याने पैडीचा श्वास फुलला होता.

तो आपल्या मित्रांशी बोलू शकला नाही.

पण त्याने त्यांच्याकडे बघून स्मित केले.
आणि त्याने आपल्या मोज्यांकडे इशारा केला.





चब हसला.

मग त्याने विचारले,

“तुला खरंच असे वाटते का तू तुझ्या
मोज्यामुळे जिंकला?“


पैडी मग परत श्वास घेऊ लागला. आता तो बोलू शकत होता. तो म्हणाला, “मला खात्री आहे मी हे मोजे घातलेले होते म्हणूनच मी जिंकू शकलो. मला वाटतं हे मोजे माझ्यासाठी खूप सुदैवी आहेत.!”


"ओह," चब म्हणाला,

“तुझे बोलणे मुर्खासारखे आहे.

तू जिंकलास कारण तू एक उत्तम धावपटू आहे.”

पैडी म्हणाला, "ठीक आहे, अस्म असू शकतं. पण मी कोणताही धोका स्वीकारणार नाही. मी नेहमी माझे सुदैवी मोजे घालूनच शर्यतीत उतरेल!”





लवकरच प्रशिक्षक आले आणि त्यांनी मुलांना म्हटले “ही एक उत्तम शर्यत होती पैडी, तू चांगला वेगात धावलास,” प्रशिक्षक म्हणाले.

“तुझा खेळ आता उत्तम होत चालला आहे. मी वाटते की तू अर्धा मैलाच्या शर्यतीत सुद्धा भाग घ्यावा. ती पुढच्या महिन्यात मोठ्या मैदानावर आहे.



“अरे वाह!" चुब ओरडला.

"ती स्पर्धा राज्य चॅम्पियनशिप आहे!
यात राज्यातील सर्वोत्तम धावपटू असतील.“

"हो," प्रशिक्षक म्हणाले.

"पण मला त्यातही वाटतं पैडी विजय अपेक्षित आहे.

तो चांगला धावपटू आहे. त्याला जिंकायचे आहे, आणि त्यासाठी तो कठोर परिश्रम करतो."

पैडीने चबला कुजबुजत म्हणाला,


"हे बघ, माझ्याकडे माझे भाग्यवान मोजे आहेत!“

"पॅडी," प्रशिक्षक म्हणाले,

“तू पुढची शर्यत बूट घालून पूर्ण करावी अशी माझी इच्छा आहे.“

"धावण्याचे जोडे!" चुब ओरडला. "होय, खरे धावण्याचे बूट! "पॅडीसाठी धावण्याच्या बुटांचा जोड आणायला प्रशिक्षक गेले.





“"माझ्याकडे नवीन मोजे आहेत, सर," पॅडी म्हणाला.“खरं तर माझ्याकडे मोज्यांच्या अनेक जोड्या आहेत. पण हे माझे सुदैवी मोजे आहेत!

हे मोजे मला जिंकण्यात मदत करतात. "ते ऐकून प्रशिक्षक हसू लागले. मग प्रशिक्षक म्हणाले, “हे बघ, तू चांगला धावपटू आहेस म्हणून रेस जिंकतोस. मला वाटत नाही की सॉक्सने तुम्हाला जिंकण्यात मदत केली असेल."

“ते वापरून बघ," प्रशिक्षक म्हणाले. “ते तुला होतात का?”


पॅडीने चपला काढल्या. “पॅडी!" प्रशिक्षक ओरडले.

“तुझे मोजे छिद्रांनी भरलेले आहेत!

तुझ्या फाटलेल्या मोज्यांमधून तुझ्या पायाची बोटं बाहेर येत आहेत!

तुझ्याकडे दुसरे मोजे नाहीत का?"





दुसऱ्या दिवशी धावण्यासाठी,

पैडीने आपले नवीन बूट वापरले.

सरांनी विचारले,

"अच्छा, तुला नवीन बूट कसे वाटले?"

“ते घालून मला खूप छान वाटले!” पैडी म्हणाला.

“आणि ते घालून मी अजून जोरात पळू शकतो.”





पैडीने कसून सराव केला. त्याने आपल्या पायांच्या नसा ताणण्याचा व्यायाम केला.



चब ओरडला, “व्वा!, दोस्त!

आता मला वाटते की तू मोठ्या अंतराची शर्यत सुद्धा जिंकशील. पैडी म्हणाला, “ होऊ शकतं, जर माझ्या सुदैवी मोज्यानी मला साथ दिली तर.”

सर म्हणाले, "पैडी, तुला फक्त एवढंच करावं लागेल. तुला खूप मेहनत करावी लागेल. तू त्या मोज्यांचा अजिबात विचार करू नको.”





त्याने आपले फुफुसे
मजबूत करण्यासाठी
लांब अंतरावर
धावण्याचा सराव केला.




त्याने आपला वेग
वाढवण्यासाठी लहान
अंतराचा सराव केला.



या सरावाचा उपयोग पैडीला अर्ध्या मैलाची शर्यत वेगाने धावण्यासाठी झाला. जेव्हा जेव्हा तो धावे तेव्हा तेव्हा तो आधीपेक्षा अधिक जोरात धावत असे. सरांनी पैडीला म्हटले,

“तू खूप कठोर मेहनत घेतली आहे. मला वाटते की तू अर्ध्या मैलाची राज्यपातळीवरची शर्यत जिंकशील.”



शर्यतीच्या आदल्या दिवशी, चबने पैडीला विचारले, "तुला कसे वाटते आहे? तू धावण्यासाठी तयार आहेस का?"

"हो मी शर्यतीसाठी तयार आहे," पैडी म्हणाला.

"मी त्या दिवशी माझे सुदैवी मोजे घालेन. मग मी पळेन आणि शर्यत जिंकेल."



शर्यतीचा दिवस आला. तो शनिवार होता आणि पैडी लवकर उठला. त्याने नाष्टा केला नाही तोच बाहेर हॉर्नचा आवाज आला.

"मला जावं लागेल," पैडी म्हणाला.

"सर मला घ्यायला आले आहेत. ते मला मैदानावर घेऊन जातील म्हणजे मी जास्त सराव करू शकेन."



राज्य चैंपियनशिप एका मोठ्या स्टेडियमवर आयोजित केली गेली होती.

पैडीला हे बघून आश्चर्य वाटले की तिथे आधीच खूप सारे लोक हजर होते.



पैडीची आई म्हणाली,

“ही घे बॅग ज्यात तुला शर्यतीसाठी लागणाऱ्या सर्व वस्तू आहेत.”


“शुभेच्छा!” पैडीच्या वडिलांनी म्हटले.

“माझी दाढी होत आली आहे, आम्ही लवकरच पोहचू. तुला पळतांना बघण्यासाठी आम्ही मैदानावर असू. शुभेच्छा बाळा!”



लॉकर रूम, कपड़े बदलणाऱ्या धावपटूनी भरलेले होते. पैडीला एक रिकामे लॉकर मिळाले, आणि तो आपले कपडे बदलू लागला.

जेव्हा त्याने आपली धावण्याचे सामान असलेली बैग उघडली तेव्हा त्याच्यात त्याचे सुदैवी मोजे नव्हते. त्याऐवजी त्यात एक पत्र लिहलेले होते..





पैडी, सार्वजनिक टेलिफोन कडे धावला.

"ओहह--" तो कुरकुरत म्हणाला.

"मला आशा आहे की माझे आईवडील अजून घरी असतील!" "बाबा! बाबा!" पैडी ओरडला.

"आईने माझ्या बैगेत नवीन मोजे ठेवले आहेत. तिने माझे सुदैवी मोजे काढून टाकले आहेत."

"ठीक आहे," त्याचे वडील म्हणाले.

पैडीने सांगितले आणि म्हटले,

"बाबा कृपया, माझे सुदैवी मोजे पाठवायला सांगा. त्याशिवाय मी शर्यत जिंकू शकणार नाही."

अन्य धावपटूनी आपले कपडे बदलले आणि ते लॉकर रूमच्या बाहेर निघून गेले. पण पैडी लॉकर रूममध्ये एकटाच राहिला. मग त्याने काही व्यायाम केले.






सर आतमध्ये धावत आले.

"पैडी!" त्यांनी जोरात हाक मारली. “तू इथे काय करतो आहेस?” तू शर्यतीत घालायचे बूट अजून का घातले नाहीस, बघ लवकरच शर्यत सुरु होईल!”

तेव्हाच चब आत धावत आला. त्याने पैडीकडे एक पेपरची पिशवी दिली. “हे घे,” चब म्हणाला. “तुझ्या आईने मला तुला हे द्यायला सांगितले.” पैडी म्हणाला, "हुर्रे!

चला, आता माझ्याजवळ माझे सुदैवी मोजे आहेत!” मी त्वरित बाहेर येतो, सर.”




मग पैडीही, इतर धावपटूच्या रांगेत उभे राहिले. पंच ओरडला,"तय़ार राहा!“


सर्व धावपटूंनी तेच केलेजे अर्धा मैल धावणारे करतात. त्याने एक पाय त्याच्या मागे ठेवला.मग तो थोडा पुढे वाकला. पंच ओरडला,

"तयार करा!“ आणि नंतर धावपटूआणखी काही पुढे झुका.










तेव्हाच पंच म्हणाले, “धावा!” आणि मग त्यांनी आपली बंदुक चालवली. अर्ध्या मैलाची शर्यंत सुरु झाली. धावपटूना मैदानावर दोन चक्कर मारायचे होते.

पहिल्या वळणावर पैडी खूप मागे होता. अधिकतर धावपटू त्याच्या पुढे होते. बाकी धावपटूंनी वेगाने धावायला सुरुवात केली होती.



पण थोड्यावेळाने काही धावपटू थकू लागले होते. पण पैडीबिलकुल थकला नाही. त्याने खूप सराव केला होता. त्याने आपल्या पुढे धावणाऱ्या खेळाडूंना मागे टाकायला सुरुवात केली. मग तो चौथ्या स्थानावर असणाऱ्या खेळाडूच्या पुढे गेला, नंतर तिसऱ्या खेळाडूच्याही.





आता पैडीच्या पुढे केवळ दोन खेळाडू होते. पण ते खूप पुढे होते आणि शर्यंत जवळपास संपणार होती. चब त्याला प्रोत्साहन देण्यासाठी ओरडला, “धाव मित्रा!”





पैडीचे वडील पण जोरात ओरडले, “धाव बाळा” आई पण ओरडली
“जिंकायचं आहे, पैडी!
जिंक! जिंक! जिंक!"



पैडीने वेगाने धावायला सुरुवात केली. मग तो दुसऱ्या स्थानावर पळणाऱ्या खेळाडूच्या पुढे निघून गेला. आता केवळ एकच खेळाडू त्याच्या पुढे होता. पैडी त्याच्या पर्यंतही पोहचला. ते दोघे खांद्याला खांदा लावून अंतिम रेषेकडे वेगाने धावले. संपण्याच्या आधी दुसरा मुलगा हळू झाला. पैडी धावत राहिला आणि तो शर्यंत जिंकला.



चबने पैडीची पाठ थोपटली. “खूप छान!” चब ओरडला. “किती छान धावलास!” पैडीच्या आईने त्याला जवळ घेतले. त्याच्या वडिलांनी पैडीचा हात हातात घेतला.





तेव्हाच सर आले. सरांनी तभी पैडीचा हात हातात घेतला. “तू चांगला धावलास!” सर म्हणाले.

“तू आता अर्धा मैलाच्या शर्यतीचा नवीन राज्य चैंपियन आहेस."

पैडी म्हणाला,

“मला आनंद आहे की मी माझे सुदैवी मोजे घातलेले होते.” मग पैडीने खाली आपल्या पायांकडे बघितले.



पैडीची आई म्हणाली,

“बघ, तुझे बाबा म्हणाले की तुला तुझे जुनेच मोजे हवे होते, तुझ्याजवळ खूप सारे जुने मोजे आहेत. मी त्यातूनच एक जोड पाठवला. हे ऐकून सर हसले.

"अरे नाही!" पैडी ओरडला.

“माझ्या सुदैवी मोज्यांवर एक लाल पट्टी होती! आणि यावर तर एक काळी पट्टी आहे. मी एवढ्या घाईत मोजे घातले की मी ते नीट बघितलेच नाही.



मग ते म्हणाले, "पैडी, ऐक शर्यत जिंकण्यासाठी कधी कोणत्या सुदैवी मोज्यांची आवश्यकता नसते. लोक जिंकतात कारण ते खूप कठोर मेहनत करतात. आणि त्यांना शर्यंत जिंकण्याची इच्छा असते कारण ते एक उत्कृष्ट खेळाडू असतात."





मग पैडीला एक मोठा चांदीचा कप मिळाला. आणि त्याच्चे वडील म्हणाले, "सगळ्यांनी ऐका."



मी गल्लीत जवळच पिझ्झाचे दुकान बघितले आहे. तुम्हाला सगळ्यांना पिझ्झा खायला आवडेल का? चब ओरडला, "ज़रूर!

मला पिझ्झा खूप आवडतो.

पैडी, लवकर आवर आणि आपले कपडे बदल.
मी तुझ्याबरोबर पिझ्झाच्या दुकानापर्यंत शर्यत लांवणार आहे. आणि मग सगळे हसले.